# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १६७ वा ❑ मंगळवार दि.१९ ऑगस्ट २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## पंढरपूर येथे ज्ञानेश्वरी पारायण सोहळा संपन्न





**ज्योतिर्मय साहित्य**

**पंढरपूर / दत्ता तरलगट्टी** – रविवार दि.१० ऑगस्ट पासून विघ्नहर्ता गणेश मंदिर आनंदनगर टाकळीरोड येथे श्री. ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचा प्रारंभ झाला. पारायण सोहळ्याची अधिष्ठान स्थापना आजरेकर-आंबेकर फडाचे मालक ह.भ.प. भागवत महाराज चवरे यांच्या शुभहस्ते सकाळी झाली. दुपार पासून पारायणास सुरुवात झाली. चाळीस ते पंचेचाळीस भाविक पारायणास बसले होते. टाकळीरोड उपनगरीय भाविक या सोहळ्यात सहभागी झाले आहेत.असा सोहळा पहिल्यांदाच टाकळीरोड उपनगरीय भागात होत असल्याने चांगला प्रतिसाद मिळाला आहे. या पारायणाच्या सर्व वाचकांना ह.भ.प.भागवत महाराज चवरे यांनी ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट म्हणून दिला. हे पारायण रयत शिक्षण संस्थेचे माजी शिक्षक हरिश्चंद्र कोरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले. पारायणाची समाप्ती श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जळगावकर यांच्या ग्रंथ पूजनाने झाली. त्यांनी आपल्या मनोगतात हे वर्ष माऊलींचे जन्मोत्सव सोहळ्याचे ७५० वे वर्ष आहे असे सांगितले. माऊलींच्या ज्ञानेश्वरी पारायणास जर वाचता आले नाही, करता आले नाही तरी त्या ठिकाणास प्रदक्षणा घातल्याने वाचनाचे फळ मिळते असे ते म्हणाले.

त्यांच्या शुभहस्ते हरिश्चंद्र कोरे गुरुजी यांचा सन्मान विघ्नहर्ता गणेश मंदिराच्या वतीने करण्यात आला. या सोहळ्यात विघ्नहर्ता गणेश भजनी मंडळाच्या सदस्यांनी व भाग्यश्री बिडकर यांनी विशेष सहाय्य केले. हा पारायण सोहळा द.ह. कवठेकर प्रशालेचे माजी मुख्याध्यापक दत्ता तरलगट्टी यांच्या संकल्पनेतून साकार झाला. तसेच सुरेशराव भिंगे, अक्कताई लवटे, जयश्री वास्ते, सुनिता जाधव, सोनंदकर, सुनंदा पाटील,सौ. घोडके, व इतर महिला सदस्यांनी सहकार्य केले. सीमा चिंचोळकर मँडम मनिषा घोसे व मनिषा भारत गदगे या इतर उपनगरातून पारायणास उपस्थित होत्या. सोहळ्याची समाप्ती उपनगरातून दिंडीने व महाप्रसादाने झाली.

## आर्थिक सुधारणांचे बिगुल-नरेंद्र मोदींची सिंहगर्जना

**ज्योतिर्मय साहित्य**

**(मागील अंकावरून)**

**संरक्षण क्षेत्रातील आघाडी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संरक्षण क्षेत्रातील भारतीय सशस्त्र दलाच्या कामगिरीचे आपल्या भाषणातून केलेले कौतुक हे एक मौलिक सूत्र होय. त्यांनी सशस्त्र दलाच्या अलीकडील सुसंगतीत




सामुदायिक कारवायांची योजनांची दखल घेतली आणि ऑपरेशन सिंदूर च्या यशस्वी ते साठी जवानांचे त्यांच्या शौर्याचे आणि मोहिमेचे कौतुक केले राष्ट्रीय सुरक्षेतील सुरक्षा दलाची भूमिका नेहमीच स्फूर्ती देणारी ठरली आहे आपल्या कारवाईमुळे पाकिस्तानची झोप उडाली आहे आणि आता यापुढे कोणीही दहशतवादी कृत्य केल्यास भारत त्याला जो उत्तर देईल शिवाय कुठल्याही प्रकारच्या अॅटॉमिक ब्लॅकमेलिंगला भारत भिक घालणार नाही हेही त्यांनी ठणकावून सांगितले.

ऑपरेशन सिंदूर मोहिमेमध्ये भारतीय संरक्षण दलाने बजावलेल्या ऐतिहासिक कामगिरीबद्दल शूर जवानांचे कौतुक करून पंतप्रधानांनी भविष्यकालीन ‘‘सुदर्शन चक्र‘‘ या संरक्षण योजनेचे बिगुल वाजविले सुरक्षेसाठी ‘‘मिशन सुदर्शन चक्र‘‘ ही योजना म्हणजे एक क्रांतिकारक पाऊल आहे, ही सुदर्शन चक्र योजना एक जागरूक क्रांतीदर्शी पाऊस आहे, पहलगाम हल्ल्यापासून धडा घेऊन आपल्या देशातील महत्त्वाच्या धार्मिक पर्यटन तसेच ऐतिहासिक स्थळांचे रक्षण करणे आवश्यक आहे. स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित चालणारा हा कार्यक्रम पुढील दशकामध्ये अत्यंत जागरूकपणे राबविण्यात येणार आहे त्यामुळे कुठल्याही महत्त्वाच्या स्थळाकडे दहशतवादी संघटना आणि त्यांचे समर्थक देश वाकडी नजर करुन पाहू शकणार नाहीत.

सिंधू जल कराराचा मुद्दा पंतप्रधानांनी आग्रहाने मांडला. त्यांच्या मते सिंधू पाणी करार विचारात घेताना आपण सदैव आपले हित पाहिले पाहिजे मागील चुका दुरुस्त करून या धोरणाचे पुनरावलोकन केले जात आहे. भारताच्या पाण्याच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी सरकार या काळाचे पुनर्मूल्यांकन करेल त्यामुळे आपल्या शेतकऱ्याची हित साध्य केले जाईल. आपल्या शेतीवर होणाऱ्या परिणामाची चिंता दूर करण्यासाठी आपणास ही दमदार पावले उचलावी लागत आहेत पाणी आणि रक्त एकाच वेळी वाहू शकत नाही हे त्यांनी ठासून सांगितले आहे. आपली संरक्षण क्षेत्रातील सिद्धता सर्व आघाड्यावर कशी भक्कमपणे उभी आहे याचे सुत्र प्रतिपादन त्यांनी केले.

**निसर्ग पर्यावरण आणि ऊर्जा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या ११ वर्षात भारताला शाश्वत पर्यावरण विकासाच्या दिशेने एक प्रगत राष्ट्र




बनविले आहे विशेषतः ऊर्जा क्षेत्रातील परावलंबन दूर करून त्यांनी सौरऊर्जा तसेच पवन ऊर्जा आणि जैव ऊर्जा या उपक्रमांना गती दिली आहे. आपल्या भाषणात त्यांनी या अनुषंगाने स्वच्छ ऊर्जेच्या उद्दिष्टांची उपलब्धता करून देण्यासाठी केलेल्या उपायावर प्रकाश टाकला आहे. भारताने २०३० च्या अंतिम मुदतीपूर्वी जीवाश्म नसलेल्या इंधन स्त्रोतापासून ५०% वीजनिर्मितीचे उद्दिष्ट साध्य केले आहे.

**लोकसंख्या शास्त्रीय अभियान**

पंतप्रधानांनी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणामध्ये डेमोक्रफिक मिशन हा एक महत्त्वाचा मुद्दा मांडला आणि साऱ्या देशाचे लक्ष वेधले त्यांच्या मते भारतामध्ये होणारी बेकायदेशीर घुसखोरी हा एक धोकादायक प्रश्न आहे अशा घुसखोरीला आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना म्हणून भारत लवकरच लोकसंख्या शास्त्रीय अभियान सुरू करणार आहे आपल्या भाषणात पंतप्रधानांनी या नव्या धोरणाचे सुतोवाच केले देशाच्या पूर्वजांनी भारताच्या हितासाठी आम्हाला स्वातंत्र्य मिळवून दिले आणि स्वातंत्र्यासाठी त्यांनी सर्वोच्च बलिदान केले, अनेक जण शहीद झाले. अशा शहिदांची त्यांच्या शौर्याची समर्पणाची आठवण ठेवून आपण बेकायदेशीर घुसखोरी करणाऱ्या कारवाया हाणून पाडणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे त्यांच्या शब्दात सांगावयाचे तर मी देशाला एका संकटाच्या रूपाने उदयास येणाऱ्या चिंतेबद्दल इशारा देऊ इच्छितो. एका पूर्वनियोजित कटाचा भाग म्हणून देशाची लोक लोकसंख्या म्हणजे डेमोग्राफी बदलण्याचा प्रयत्न केला जात आहे एका नवीन संकटाची बीजे पेरली जात आहेत हा त्यांनी प्रकट केलेला धोका खरोखर विचार करायला लावणारा आहे. हे घुसखोर आपल्या देशातील तरुणांचे पोट हिरावून घेत आहेत आपल्या देशातील मुले व बहिणींना ते लक्ष करत आहेत आणि त्यांच्या वनजमिनी बळकावण्याचा प्रयत्न करत आहेत. केंद्र सरकार या उच्च संकटाचा सामना करण्यासाठी व्यापक मिशन सुरू करण्याचा निश्चय केला आहे. उच्च शक्तीचे हे डेमोग्राफिक मिशन आपल्या देशाचे राष्ट्रीयत्व बळकट करण्यासाठी निश्चितच फलदायी ठरू शकेल.

**समारोप**

या सर्व चर्चेवरून हे स्पष्ट होते की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्याच्या प्राची वरून केलेल्या भाषणांचा मुख्य केंद्रबिंदू आर्थिक सुधारणांचे बिगुल हा होता तसेच त्यांनी सुदर्शन चक्राच्या रूपाने देशातील पवित्र ऐतिहासिक व धार्मिक स्थळांना सुरक्षा कवच प्रदान करण्याचे अभिवचनही दिले आहे. भारताची संरक्षण सिद्धता तसेच आपल्या सीमांचे रक्षण करण्याचा संकल्प यावरही त्यांनी भर दिला युवक हा भारताच्या भावी प्रगतीचा अग्रदूत आहे आणि असा समर्थ व बलशाली युवक प्रगत विज्ञान तंत्रज्ञानाच्या आधारे अधिक सक्षम होत आहे. भारत ही जगाची कौशल्य राजधानी आहे हे लक्षात घेऊन पाच कोटी तरुणांना नवा रोजगार देण्याची महत्त्वाची योजना त्यांनी घोषित केली. या योजनेची मधुर फळे म्हणजे युवकांचे स्थान अधिक भक्कम करण्याचा प्रयत्न होय. तसेच महिला बचत गट असो किंवा ड्रोन दीदी, लखपती दीदी यासारख्या योजनांचे महत्त्व सांगून त्यांनी भारताच्या आर्थिक प्रगतीचे युवक महिला शेतकरी आणि गरीब हे चार स्तंभ भक्कम करण्यावर अधिक भर दिला. सेमीकंडक्टर उद्योगात घ्यावयाची गरुड झेप ही आपल्या नवकल्पनांच्या विकासाची साक्ष आहे. पंतप्रधानांनी आपल्या भाषणात विज्ञान तंत्रज्ञानाचा उद्घोष केला, आपल्या संरक्षण सिद्धतेची ग्वाही दिली, दहशतवादाचा निषेध करून शेजारी राष्ट्राला ठणकविले आणि आपल्या राष्ट्राच्या भावी प्रगतीचा पथदर्शक मार्ग स्पष्ट केला. त्यामुळे आर्थिक विकासदर असा वाढत राहील. भारत प्रगतीच्या नवनव्या दिशेने वाटचाल करेल आणि समर्थपणे जगातील तिसऱ्या आर्थिक सत्ता म्हणून उदयास येईल यात शंका नाही. पंतप्रधानांचे भाषण म्हणजे भावी आर्थिक सुधारणांचे स्फूर्तीदायक बिगुल आहे असेच म्हणावे लागेल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हे आतापर्यंतचे एक उत्कृष्ट भाषण म्हणावे लागेल त्यांनी आपल्या भाषणात युवक शेतकरी तसेच सामान्य गरीब माणसांचे प्रश्न मांडले आणि उचलून धरले त्यांच्या भाषणातील आत्मविश्वास आणि लोक शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी आणखी काही नव्या योजनांची अपेक्षा आहे. स्वदेशी वस्तूंची गुणवत्ता आणि जगाच्या बाजारपेठेत टिकण्याची आणि नवी बाजारपेठ काबीज करण्याची क्षमता वाढविताना आपण चीन अमेरिका यांच्याशी सुद्धा टक्कर देण्याची क्षमता विकसित केली पाहिजे. स्वदेशीचा आग्रह हवा, त्याबरोबर प्रगत तंत्रज्ञानाची साधनही हवी या दोहोमध्ये सुंदर समन्वय साधून पंतप्रधान नरेंद्र मोदी आधुनिक भारताची गतिमान प्रमाणे वाटचाल करत आहेत यात शंका नाही त्यांचे भाषण हे या वाटचालीचा एक नवा अध्याय आहे.

***

## विशेष लेख...

## पत्नी संबंधातील कटुतेचा मुलांवर होणारा परिणाम

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

अलीकडे नातेसंबंध खूपच गुंतागुंतीचे होत चालले आहेत.मोठ्या शहरांमध्ये राहणाऱ्या सुशिक्षित नागरिकांपासून ते गावे आणि शहरांपर्यंत, जवळच्या नात्यांचे विघटन गुन्हेगारी घटनांच्या स्वरूपात बाहेर येत आहे. पती-पत्नीमधील संघर्षाची परिस्थिती प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे गुन्हेगारी घटनांचे रूप घेत आहे. नातेसंबंधात वाढता गैर विश्वास, प्रेमाचा अभाव,

गैरसमज, संवाद कमी होणे, एकमेकांबद्दल आदर कमी होणे, आर्थिक समस्या, किंवा बाह्य व्यक्तींमुळे होणारे वाद या कारणांमुळे मनाला हादरवून टाकणाऱ्या घटना समोर येत आहे. पती पत्नी संबंधातील कटुतेचा परिणाम मुलांवर होत आहे.

अलिकडेच पती-पत्नीतील नात्यात ताटातूट आणि वेगळेपणा यामुळे समोर आलेली एक घटना मानवी वर्तनातील विकृतीचे उदाहरण बनली आहे. महाराष्ट्रातील अहिल्या नगर जिल्ह्यातील राहता या गावातील एका पित्याने चार मुलांना विहिरीत ढकलून स्वतः आत्महत्या केली. पती-पत्नीतील वाद विकोपाला गेला सतत च्या वादाला वैतागून पत्नी शास्त्री येण्यास नकार देत होती तिला आणायला निघालेल्या पतीने वाटेतूनच पत्नीला फोन लावला पण तिने मोबाईल नंतर ब्लॉक केला याचा राग आल्याने एक मुलगी, तीन मुले अशा चौघांना रात्री राहता तालुक्यातील कोऱ्हाळे शिवारातील विहिरीत ढकलून देत पतीने स्वतः आत्महत्या केली.

पती-पत्नीमधील वादांचा मुलांवर खूप नकारात्मक परिणाम होतो. त्यांना अनेकदा मानसिक आणि भावनिक दुखापत होते आणि त्यांच्या भविष्यावरही नकारात्मक परिणाम होऊ शकतो. पालकांना भांडताना पाहून मुलांना भीती आणि असुरक्षित वाटू शकते, ज्यामुळे भावनिक आघात होऊ शकतो.मुले चिडचिडी, रागावलेली किंवा नैराश्यग्रस्त होऊ शकतात. ते शाळेत चांगले कामगिरी करू शकत नाहीत आणि सामाजिकदृष्ट्या एकटे पडू शकतात. पती-पत्नीमधील भांडणांमुळे मुलांमध्ये चिंता, नैराश्य आणि इतर मानसिक आरोग्य समस्या उद्भवू शकतात.मुलांमध्ये नातेसंबंधांबद्दल नकारात्मक दृष्टिकोन निर्माण होऊ शकतो आणि भविष्यात निरोगी नातेसंबंध निर्माण करण्यासाठी संघर्ष करावा लागू शकतो.

पती-पत्नीमध्ये भांडणे होत नसली तरी, त्यांच्यात सामान्य संबंध नसल्यास, मुलाच्या भविष्यावर परिणाम होतो. वडिलांना मुलाबद्दल भीती राहते आणि तो शिस्तबद्ध राहतो तर आई त्याच्याकडे दुर्लक्ष करते.

इथे भांडणे म्हणजे वेगळे होणे, तिथे मुले एक किंवा दोघांच्याही प्रेमापासून वंचित राहतात आणि जी गोष्ट उपलब्ध नसते ती त्यांना नेहमीच रिकामी वाटते.

मुले परिस्थितीच्या मदतीने त्यांचे भविष्य घडवतात, परंतु योग्य मार्गदर्शन न मिळाल्याने ते विचलित राहतात. नशीब चांगले असेल तर ती वेगळी बाब आहे, अन्यथा त्यांना जे पात्र आहे ते मिळत नाही. चांगले भविष्य घडवण्याची परिस्थिती असतानाही ते चांगले भविष्य घडवण्यापासून वंचित राहतात.पती पत्नीनेएकमेकांशी मोकळेपणाने आणि प्रामाणिकपणे बोलायला पाहिजे एक मेकनच्या भावना व्यक्त करायला पाहिजे.दोघांनी तडजोड करायला शिकले पाहिजे. प्रत्येक वेळी आपले म्हणणे सिद्ध करण्याचा प्रयत्न करू नये. कधीकधी दुसऱ्या व्यक्तीचा दृष्टिकोन समजून घेणे आणि तडजोड करणे चांगले असते. एकमेकांसाठी वेळ काढायला पाहिजे

धावपळीच्या जीवनात एकमेकांसाठी वेळ काढणे कठीण असू शकते, परंतु ते खूप महत्वाचे आहे. एकत्र वेळ घालवल्याने एकमेकांच्या जवळचे वाटेल आणि भांडणे कमी होण्यास मदत होईल.

एकमेकांचे कौतुक करायला शिकले पाहिजे .छोट्या छोट्या गोष्टींसाठी एकमेकांचे कौतुक करायला विसरू नये. यामुळे नाते मजबूत होण्यास मदत होईल.

## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख -20



राशीचक्रातील 'सिंह' राशी ही 'अग्नी' तत्त्वाची आहे. अर्थातच रंगचक्रातील उष्ण रंगसंगतीतील रंग या राशीला अधिक प्रभावी करतात. राशीला म्हणजे 'सिंह' राशीच्या व्यक्तींना. पुरुषप्रधान ही रास असल्याने, प्रत्येक कार्यात पुढे होवून काम करणे हा महत्वाचा गुण या राशीच्या जातकांचा असतो.

राशीस्वामी 'रवि' महाराज अर्थात सृष्टीला सौर ऊर्जा बहाल करणारे, सात अश्वांच्या रथावर बसून, सृष्टीला समृद्ध करणारे "सूर्य देव" या राशीच स्वामी आहेत..

ताकदवान व्यक्तीला विरोधक खूप असतात. छुपे शत्रु तर यांना अनगिनत असतात. या साऱ्यांना समर्थपणे तोंड देवून शह देणे, शत्रूचा समाचार घेणे,या व अशा अनेक समस्यांना तोंड देवून 'जातक' पुढे जात असतो. विरोधकांना सतत तोंड देण्यामुळे या व्यक्तींची शक्ती वाया जाते. अशी शक्ती वाया, जावू नये म्हणून या व्यक्तींनी 'वास्तुशास्त्र पेंटींग' घरात लावले आणि त्याच्या कडे फावल्या वेळेत पाहत राहील तर खूप जादुई फरक या व्यक्तींना अनुभवायला मिळतो.

या राशी वर जन्मणाऱ्या व्यक्तीचे जन्मनक्षत्र 'मघा', 'पूर्वा फाल्गुनी', आणि काही प्रमाणात नक्षत्र प्रभाव असलेले 'उत्तरा फाल्गुनी', ही तीन नक्षत्रे असतात. शक्यतो पहिली दोन नक्षत्रेच अधिक प्रभावी ठरु शकत असलेने अनुक्रमे 'वड' आणि 'पळस' ही दोन आराध्य वृक्ष व त्याचे आराध्य देव 'पितर' आणि 'भग' हे असतात.

या सर्व घटकांचा समावेश आणि इच्छुक व्यक्ती म्हणजे ज्या व्यक्तीला 'हे' वास्तुशास्त्र पेंट्रींग' बनवायचे आहे ती इच्छुक व्यक्ती.... तिची वैयक्तिक माहिती, या सर्या तपशीलातून त्यांच्या साठीचे 'वास्तुशास्त्र पेंटींग' बनवले जाते. आपण एखादे 'स्पाइसी फूड' खाल्ले तर आपल्याला ते 'जळजळते'. त्यावर आपण मेडीकल मधून 'अँटीसीड'आणून ते सेवन करतो. जेणेकरून शरीर स्वास्थ्य टिकून राहते. अगदी ह्याच तत्वाने आपला द्वेष, करणारे आपले हितशत्रु यांना शह देण्यासाठी त्या 'अँटीसीड'ची भुमिका 'वास्तुशास्त्र पेंटींग साकारत असते.

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238


## आकर्षक बक्षिस योजना

वास्तुशास्त्र पेंटींग या अनोख्या विषयावरील "लघु लेखमाला" एका सप्ताहातच वाचकप्रिय होऊ लागली आहे.या लघुलेख मालेचे लेखक,हे जगप्रसिद्ध वास्तुशास्त्र आणि रंग शास्त्र तज्ज्ञ आहेत. त्यांना अनेक जिज्ञासू वाचकांचे फोन होताहेत. अशा वेळी, जेव्हा क्रमशः लेख क्रम राहून जातो.या लेखमालेतील प्रत्येक लेख हा कुठल्यातरी बाबीचा संदर्भ असु शकतो.म्हणून एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान आणि ज्योतिर्मय यांच्या संयुक्त विद्यमाने आम्ही एक योजना आणली आहे. "वास्तुशास्त्र पेंटींग या लघुलेख मालेचे क्रमवार लेख दर महिन्याला जमा करून जो किंवा जे वाचक, ज्योतिर्मय च्या कार्यालयाकडे पाठवतील त्यापैकी भाग्यवान क्रमांकांना एस्.व्ही.एस्.कला प्रतिष्ठान कडून आकर्षक पारितोषिक प्रदान करण्यात येईल.



# जात्यावरच्या ओव्या......

---


आडाच्या पाण्याला
कशाच झाकण?
दादाला व माझ्या
देवाच राखण ||२११||

पुतळ्याची माळ
गावा जायला यायला,
कपाळाचं कुंकू
नित् दागिना लेयाला ||२१२||

---

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# लोकमाता अहिल्याबाई होळकर - भाग १




**ज्योतिर्मय साहित्य**

अहिल्याबाईंमध्ये तेवढ्याच लहान वयात नीतिकथा, दयाळूपणा आणि समतेची बीजं पेरली गेली. अहिल्याबाई या शिवभक्त होत्या. सीना नदीच्या वाळवंटी आपल्या मैत्रिणींना घेऊन त्या शिवलिंग तयार करीत आणि त्याला पाणी - फुले वाहून भक्ती भावाने पूजा करीत. हाच त्यांचा आवडता खेळ आणि विरंगुळा होता.




मल्हारराव होळकर हे मराठा साम्राज्याचे एक महत्वाचे सेनापती. थोरले बाजीराव आणि मल्हारराव चौंडी येथे मुक्कामास असताना त्यांना अहिल्याबाई दिसल्या. ती शांत, प्रसन्न चेहऱ्याची, पण बुद्धिमान आणि चुणचुणीत असलेली मुलगी त्यांना आवडली. त्यांच्या लक्षात राहिली. त्यांनी आपल्या पत्नी गौतमीबाई यांच्याशी बोलून ती आपली सून व्हावी अशी इच्छा प्रकट केली. त्यावेळी अहिल्याबाई होत्या फक्त आठ वर्षांच्या आणि खंडेराव बारा वर्षांचे होते. या विवाहाला थोरवे बाजीराव यांचा सक्रिय पाठिंबा होता.

लग्नानंतर अहिल्याबाई इंदूरला गेल्या आणि त्या घरातील संस्कृती, रीती रिवाज त्यांनी आत्मसात केले. लवकरच त्या एक सुसंस्कृत, कर्तव्यदक्ष, आज्ञाधारक आणि बुद्धिमान सून म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. खंडेराव यांच्या सहवासात त्यांनी राणी म्हणून नव्हे, तर जनतेच्या सेवेसाठी स्वतःला घडवायचं ठरवलं. त्या त्यांच्यासोबत मोहिमांवर जाऊ लागल्या, शासनातील कारभारात रस घेऊ लागल्या. मल्हाररावांनी हळूहळू त्यांना प्रशासकीय कौशल्ये शिकवायला सुरुवात केली.

दुर्दैवाने १७५४ मध्ये खंडेरावांचा कुम्भेरच्या युद्धात मृत्यू झाला. त्यावेळी अहिल्याबाईंचे वय होते फक्त तीस वर्षांचे. ऐन तारुण्यात आलेला हा प्रसंग अत्यंत दुःखदायक होता. परंतु अहिल्याबाईंचं आयुष्य तिथे थांबलं नाही. नियतीला त्यांच्या हातून मोठे कार्य करून घ्यायचे होते. त्या सती जाण्याचा विचार करत होत्या, पण मल्हाररावांनी त्यांना रोखलं. तू प्रजेची आई आहेस तुला त्यांचं रक्षण करायचं आहे असं त्यांनी म्हटलं. हीच गोष्ट त्यांचे जीवनाला वेगळे वळण देणारी ठरली.

अहिल्याबाईंच्या जीवनाचा आलेख पाहिला तर ज्या शिवलिंगाने त्यांना होळकरांची सून बनवले होते, तेव्हाच ती बाल अहिल्या संपली आणि एका कर्तृत्ववान स्त्रीचा जन्म झाला. त्यांना अनेक संकटातून त्यांच्या परमेश्वरावरील दृढ श्रद्धेनेच तारले. त्यामुळे त्या उभ्या राहिल्या. परमेश्वरावर दृढ श्रद्धा असणाऱ्या अहिल्याबाईंनी स्वतःसाठी देवाकडे कधी काही मागितले नाही. त्यांनी प्रत्येक कार्य ईश्वराला स्मरून केले. त्यामुळेच त्यांचा राज्यकारभार अत्यंत पारदर्शी राहिला. गीतेतील कर्मयोगाची शिकवण त्यांनी आचरणात आणली. त्यामुळे त्या खऱ्या अर्थाने कर्मयोगिनी होत्या. **(क्रमशः)**






उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# शुध्दज्ञान निरूपण

**ज्योतिर्मय साहित्य**

महावाक्यांमध्ये परमार्थाच्या उपदेशाचे सार आहे, म्हणून त्याचे मनन केलेच पाहिजे,नुसत्या जपाने अज्ञानाचा अंधार नाहीसा होत नाही. आत्माब्रम्हस्वरूप किंवा परमात्म स्वरूप आहे आणि आपण आत्मस्वरूप आहोत. मी देह नसून आत्माच आहे आणि आत्मा ब्रम्हस्वरूप असल्याने मी ब्रम्हस्वरूप आहे असा प्रत्यक्ष अनुभव येणे म्हणजे आत्मज्ञान प्राप्त होणे समजावे. या ज्ञानाला शुद्ध, निर्मळ स्वरूपज्ञान असे वेदांतामध्ये सांगितले आहे हे ज्ञान सुक्ष्म विचाराने आपल्यामधे उदय पावतै. म्हणून सर्व विरोध मावळतात.

उपनिशदामधील याचे सुंदर वर्णन पहायला मिळते.

१) असौ य: असौ पुरूष: स:अ हं अस्मि/

ईशावास्य////यद् आत्मतत्वेन तु ब्रम्ततत्वं दीपोपमेनेह युक्त:. प्रपशयेत।अजं ध्रुवं सर्वतत्वेर्विशुद्ध ज्ञात्वा देवं मुच्युते. सर्वपाशै:।

अर्थ- मनुष्यप्राणी जसे दिव्याच्या सहाय्याने वस्तु पहातो त्याच प्रमाणे योगी आत्मतत्वाच्या सहाय्याने

अज, ध्रुव, परमश्रेष्ठ व कांतिमान ब्रम्हतत्व पहातो.

२)यत्परं ब्रम्ह सर्वात्मा विश्वस्यायतनं महत।सूक्ष्मात सुक्ष्मतरं नित्यं स त्वमेव,त्वमेव तत्

३)मयि एव सकलं जातं मयि सर्व प्रतिष्ठितं। मयि सर्व लयं यातितद् ब्रम्ह अद्वयम् अस्मि अहम्।।

अर्थ---सर्वोत्तम् ब्रम्ह सर्वाचा आत्मा आहे. विश्वाचे मुळ आहे. अतिशय सुक्ष्म व नित्य आहे. ते तू आहेस. ते तूच आहेस.

माझ्यातून सर्व व्यक्तदशेस येते, माझ्या मध्ये जगते, माझ्यांतच लय पावते. ते अद्वय ब्रम्ह मीच आहे. त्वमेव प्रत्यक्ष ब्रम्हासी महावाक्यांचे मनन करून. त्यामधील अर्थाचा.स्वतः अनुभव घेणे हे ज्ञानाचे मुख्य लक्षण आहे. श्री ब्रम्हच आहे. हा महावाक्याचा खरा शुद्ध, सूक्ष्म अर्थ आहे. आपले हरवलेले स्वस्वरूप आपल्याला प्राप्त होणे,आपल्यातला खरा मी आपण जाणणे हे ज्ञान फारचं दुर्लभ आहे. कारण ते आरंभापासून शेवटपर्यंत स्वयंभू आत्मस्वरूप असते. १. स्वयंभू -- म्हणजे स्वतः सिद्ध,आत्म्याला जाणणारा आत्म्याशी तादात्म्य पावून आत्मज्ञान मिळवतो. त्यामुळे त्याच्या ज्ञानाचे प्रमाण त्या ज्ञानामध्येच अंरर्भूत असते. म्हणून आत्मज्ञान स्व:त सिध्द असते.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# जेथे भगवंताचें नामस्मरण । तेथे सर्व संतांचें ठाण ॥

**ज्योतिर्मय साहित्य**

जोंवर धरिली जगाची आस । तोंवर परमात्मा दूर खास ।। परमात्म्याची प्राप्ति । न होई राखता विषयासक्ति ।। जग विषयाकार राहिले । तेथे प्रेम केले तरी घातासी आले ।। विषयी एकजीव झालो जाण । सुटता न सुटे आपण जाण ।। मान, अपमान, जगाचे सुख-दुःख । हे स्वार्थाचेच मूळ आहे जाण ।। अभिमानात परमात्म्याचे विस्मरण । हें जीवपणाचें मुख्य लक्षण ।। सुख-दुःख, विपत्ति-आपत्ति,। ही माया प्रपंचाची ओहोटी भरती ।। आत्मनिश्चय बाणल्यावांचून । माया न हटे न सुटे जाण ।। आता करी शूर मन । मायेसी हटवावे आपण ।। जैसें जैसें बाहेर दिसलें। त्याचें बीज आपणाशीच उरलें ।। एकच वस्तूची ओळखण जाण । पूर्ण होते समाधान ।। ज्याच्यांत मानावें मी सुख । त्याच्यातच उद्भवतें दुःख ।। नराचा होय नारायण । जर न चुकला मार्ग जाण ।। जेथे ठेवावी आस । त्याचे बनावें लागतें दास ।। देह तो पंचभूतांचा । त्याचा भरवसा न मानावा फारसा ।। मी तुम्हांस सांगतों हित । दृश्यांत न ठेवावें चित्त ।। दृश्य वस्तु नाशिवंत असते । भगवत्कृपेने समाधान येतें ।। परिस्थिति नसे बंधनास कारण । असे आपलेच मनाची ठेवण ।। देवास पाहावें ज्या रीतीनें। तसाच तो आपणास दिसतो जाण ।। विषयाचा नाही झाला जोंवर त्याग । तोंवर रामसेवा नाही घडत सांग ।। आपलें आत्यंतिक हित । हेंच खरा स्वार्थ जाण ।। चित्तीं जे विषयापासून सुटले । ते आनंदासी आले ।। रामनाम प्रेमयुक्त चाले धणी । त्यासी म्हणती ब्रह्मज्ञानी ।। द्रव्यदारावर्जित जाण । ही खरी संताची खूण ।। सृष्टि पाहावी भगवदाकारी । प्रेम ठेवील त्याचेवरी । त्याला नाही दुसरी सरी ।। आल्यागेल्यास द्यावे अन्नदान । मुखानें भगवंताचें नाम । हृदयांत रामाची प्रीति । यासच थोर म्हणती जीवन्मुक्ति ।। न धरावी जगाची आस । तोच होऊ पाहे रामदास ।। नामांत संत । नामीं भगवंत ।। वृत्ति राखावी अत्यंत शांत । हेंच संताचें मुख्य लक्षण जाण ।। जेथे भगवंताचें नामस्मरण । तेथे सर्व संतांचें ठाण ।। अगरबत्ती जळून गेली । परि सुवासाने राहिली। तैसे रामचरणी झाले जे लीन । तेच खरे जिवंत जाण ।। संतचरणीं झाला लीन । त्याला भाग्यास नाही दुजें उणें। संताची संगति । भगवन्नामानें साधते ।। देहासकट माझा प्रपंच । रामा केला तुला अर्पण ।। ऐसें वाटत जावें चित्तीं । कृपा करील रघुपति ।।

# ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

## जगद्गुरु संत श्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांचा अभंग (भाग दोन)

**ज्योतिर्मय साहित्य**

बेरीज. तणाव स्थिती
० ते १४९. कमी
१५० ते २०० मध्यम
२०१ते ३००. तिव्र
३०१च्या वर अति तिव्र

या मोजमापावरून प्रत्येकाने आपण खरंच किती तानात आहोत हे पहावे व मध्यम ते तीव्र आणि अति तीव्र या तणाव परिस्थितीमध्ये या तानाचा परिणाम शरीरावर देखील झाल्याखेरीज राहत नाही तणावग्रस्त व्यक्तीचा व्यवहार कसा असतो ते आपण आता पाहू

१ होणाऱ्या त्रासाबद्दल अशा व्यक्ती अति संवेदनशील असतात

२ आत्मविश्वासाचा अभाव असतो

३ पुन्हा तीच परिस्थिती उद्भवली तर पुन्हा तोंड देण्याची हिंमत नसते

४ इतरांच्या हेतूबद्दल शंका असते

५ अशा व्यक्तींना जास्त मित्र नसतात

६ स्वतः अपराधीपणाची भावना ठेवतात

७ तणावग्रस्त व्यक्तीच्या लघवीतील फॉस्फुरिक ऍसिड मध्ये वाढ होते.

तणावाला अगदी किरकोळ कारणही पुरते जसे गोंगाट सहन न होणे पत्नीचे नीट नेटके न दिसणे आई-वडिलांचे भांडण इत्यादी किरकोळ कारणावरूनही तणाव येऊ शकतो.

तणावामुळे होणारे आजार :

१डोकेदुखी २ मासिक पाळीचा त्रास ३अन्य वेदना ४ लघवीचे अधिक प्रमाण ५ बद्धकोष्ठता ६ अपचन ७ ओटी पोटात दुखणे ८ अधू - दृष्टी ९ चिंतेचा पारा अधिक असतो १० मद्य सेवन ११ मनशांती साठीची औषधे १२ झोपेच्या गोळ्याचे सेवन १३ डॉक्टर यांच्यावर प्रसन्न असतात (नित्य उत्पन्नाचे साधन म्हणून)

तणावामुळे आणखीही काही समस्या उद्भवतात. जसे १. सुखी असल्याचे वाटत नाही २. हृदयाचे ठोके वाढतात ३. छातीत दुखते ४. पोटावर ताण पडतो ५. उलट्या वारंवार होतात ६. जुलाब होतात ७ धाप लागते ८ गुदमरल्या सारखे वाटते ९. निश्वास टाकण्याची सवय १० कारण नसताना चक्कर येते ११. दरदरून घाम येतो १२. थंडी वाजून येते १३. वारंवार लाज वाटते १४. किरकोळ गोष्टीवरून ओरडतात १५. प्रतिक्रिया व्यक्त करणे कठीण जाते.१६. चुळबूळ चालू असते १७. भीतीने थरथर कापतात १८ स्वतःभोवती गिरक्या घालतात १९. अंगात त्राण शिल्लक राहत नाही. २०. सहजगत्या थकतात २१. झोपताना त्रास होतो २२. बोबडी वळते २३. यांना स्वप्न जास्त पडतात.

वरीलपैकी सर्वच लक्षणे प्रत्येक व्यक्तीत दिसत नाहीत तर काही लक्षणे दिसतात.

मनावर तणाव घेणाऱ्याचे मन चंचल असते. त्यांचे मनात भ्रम तयार होतात. मनात चंचलता आली की मन भूत व भविष्यकाळात जाते व वर्तमान काळातून हटले जाते.असे झाले की चैन आनंद संपला असे समजावे.राग आला की मन चंचल होते, पागल होते.

म्हणूनच मनाची बेचैनी संपवायची असेल तर मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण असे मन प्रसन्न करण्या कसे करावे यासाठीचे जे प्रयोग आहेत ते पुढील भागात आपण पाहू.



# ॥ निरूपण ॥

ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

३४. जागी सदैव माता।
खरे सांगतो तुम्हासी। काही नाही दिले अंबेसी।
विचारे केली याचना। माये भाकली करूणा।
असे लेकराच्या हिता। जागी सदैव माता।
हासे गुरुवचनी निष्ठा। लाभलेसे सर्वाभिष्टा।।
३५. अंबानाम-महात्म्य
वाचता नाम वाचवे रे नाम।
नामाचा करावा आपण नेम।
प्रेम सप्रेम जीवन आनन्द।
भक्तीच्या कल्लोळे तरंग मंद।
अंबेच्या कृपेने सहज तरणे।
सुरथादि घ्यावे उदाहरणे।
ऐसिया भक्तांचे दास मी व्हावे।
हीच एक आस चंद्रहासमने।।

# ॥ श्री राम कथा ॥




**ज्योतिर्मय साहित्य**

नथनी दी जिस यारने उसे याद करते बार बार नाक दिया जीभ भगवान ने उसे भुलाये नार

सुग्रीवाला तू विसरलास हे जेव्हा सांगितले तेव्हा तो सुधारला. मग सीता मातेचा शोध सुरू झाला. समुद्र उल्लंघन करून कोण जाईल. हनुमान आपल्या शक्ती, ऋषीच्या शापाने विसरला होता प्रभूने त्यास त्याच्या सामर्थ्याची आठवण करून दिली. तिथे संपाती भेटला. तो जटायू याचा भाऊ होता. त्याला जटायू चे वृत्त कळले. त्याने सांगितले की समुद्राच्या त्या पलीकडील किनाऱ्यावर मी एक स्त्रीस सतत राम नाम घेताना पाहिले आहे. आता दिशा निश्चित झाली. आता समुद्र उल्लंघन करुन कोण जातो हे ठरले. मारुती राय यांनी उड्डाण केले. लंकेत उतरले. लंका ही अलौकिक नगरी होती.तिथे सोन्याची, तांब्या पितळेची, दगड, मातीची घरे होती. ते सर्वत्र फिरले. लंकेकडे जाण्यापुर्वी हनुमान रामा जवळ गेले व विचारले, आम्ही सीतेला कसे ओळखावे. रामांनी तयास कांहीं गुह्य गोष्टी सांगितल्या ज्या केवळ राम व सितेसच माहित होत्या. त्यांनी हनुमंताजवळ सितेला ओळख पटविण्यासाठी एक अंगठी दिली.

**कथा ऐकता ऐकता धावते संकलन**
**मधुकर बोरीकर, 9403061886**

हनुमान रावणाच्या अंतपुरात, सीतेच्या शोधात फिरला. तिथे अत्यंत बीभत्स वातावरण होते. याचे वर्णन रामाला नंतर त्यांनी सांगितले. तिथे रावणाच्या अनेक स्त्रिया वस्त्र हीन अवस्थेत पडल्या होत्या. मग तुझ्या ब्रह्मचर्याचे काय? असे रामांनीच हनुमानास विचारले. तो म्हणे तिथे उघड्या नागड्या रावणाच्या स्त्रिया होत्या पण माझे चित्त किंचितही ढळले नाही. **(क्रमशः)**




# वांगं आणि औषधी... काय पण सांगताय..?

**ज्योतिर्मय साहित्य**

वांग्या बद्दलची माहिती ऐकल्यावर, काय राव ,सांगता वांगे एवढ औषधी असतय होय? असा एक साधा प्रश्न, गावाकडच्या माणसाने मला विचारला. वांग्याचं भरीत तुम्ही खाल्ले का हो ? आम्ही अजून मधून-मधून वांग्याचं भरीत आवडीने खातो व भरीत करायला तर एकदमच सोप्प. विशेषतः चुलीवर तयार केलेल्या म्हणजेच भाजून तयार केलेले खूपच उत्कृष्ट लागते. वांगे हे खूपच पौष्टिक आहे. भाजी करताना वांग हे खूप कच्चे नसावे व खूप पिकलेले ही नसावेत, ज्याच्यात परिपक्व असा आहे, पूर्ण असे विकसित झालेले वापरावे, लहान वांगे हे पित्त व कफ कमी करते. मोठे वांगे पचायला हलके असले तरी थोडे पित्तकर आहे. वांगे खायचे झाल्यास डोरली वांगे, कोंबडीच्या अंड्याचा सारखे असणारे पांढरे वांगे, काटेरी वांगी व गावरान अशा काही जाती आहेत तेच खावे, असे आमचे आग्रहाचे सांगणे आहे, वांग्याचे एवढे औषधी उपयोग आहेत हे बऱ्याच जणांना माहिती नसते, गावाकडील लहानपणाचे दिवस मला अजूनही आठवतात, लग्नामध्ये किंवा कार्यामध्ये, पळसाच्या पत्रावळी मध्ये वांग्या चवळीची भाजी, डाळ, भात घरी तयार केलेले एखादा आंबट लोणचे खाल्लं की समाधानाची ढेकर सुटते. असे आमच्या लेखाने, वांग्या बद्दल चे काही गैरसमज सोडले जातील व वांग्याची भाजी घरोघरी आवडीने खाल्ली जाईल, एवढी ही गुणी आहे. आपण आपल्या गच्चीवर किंवा कुंडीमध्ये वांग्याची झाड लावू शकता.

१) वांग्याचे भरीत:-

वांग हे चांगलं धुऊन घ्यावे, चुलीवर किंवा गॅस वर चांगले भाजावे. वरची जळलेली साल काढून टाकावी, मग त्यामध्ये मिरपूड, हिंग, सैंधव टाकून चांगले घोटावे व ज्वारीच्या भाकरीबरोबर खावे, भरिता मध्ये तेल कधीही टाकू नये, टाकले तर पचायला खूपच जड होते, अन्नाचे त्यांनी चांगले पचन होते, भूकही छान लागते ,भरतासाठी डोरलं वांग भेटल्यास एकदम उत्तम. माझ्याकडे येणाऱ्या दोन प्रकारच्या रुग्णांना मी भरीत खायला सांगतो, ज्यांना झोप लागत नाही, त्यांनीही रात्री खावे, तसेच बऱ्याच जणांची सारखे पोट दुखत असते, पोट फुगले की मग हृदयावर दाब पडतो. मग कसतरी होतय, अस्वस्थ होतंय.अशी लक्षणे जाणवतात, त्यांना हा भरताचा प्रयोग छान लागू करतो, मात्र यासाठी डोरलं वांग, जास दश मुळात बहती असे म्हणतात ते भेटल्यास चांगल, ‘‘भाव प्रकाश नावाच्या ग्रंथात याचे खूप छान वर्णन केलेले आहेत, ग्रंथात सर्व गोष्टी सांगितलेले असतात, त्यासाठी ग्रंथाचे सतत वाचन गरजेचे असते,

**संकलन -**
**डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)**
**पिंपरी-चिंचवड, पुणे.**
**आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक**
**संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९**

२) ताप खोकला:-

तापामध्ये, ही भाजी जरूर खावी. काहीजण वांग्याच्या बिया काढूनही भाजी करतात, तापात तोंडी लावण्यासाठी ही भाजी उत्तम आहे. तोंडास चांगली रुची येते, शरीरातील कफ कमी होऊन, आम कमी होतो तापात ताजी वांगी वाफवून करावेत त्यात चवीसाठी सैंधव व आले टाकावं खूप छान भाजी होते, घरातील कुणी आजारी असल्यास, जरूर करून बघा. लाल तिखट हे टाकू नये . वाफवून भाजी केल्यास छान लागते. तांदूळ भाजून केलेला मऊ भात व वांग्याची भाजी, ताप खोकल्या मध्ये उत्तम आराम देणारी योजना आहे.

३) मुळव्याध:-

मूळव्याधीच्या लोकांना मी पांढरे वांगे खाण्याचा सल्ला देत असतो व काहींना वांगी भाजून ते फडक्यात बांधून त्याने ही जागा शेकायला सांगतो, मात्र ते काळजीपूर्वक करावे.

**(क्रमशः)**

## फुलमाला....





ब्रम्हकमळ..

हिमालयात उमलणारे फुल
विष्णू नाभीतील ते ब्रम्हकमळ
ब्रह्मदेव,शंकराला हे वाहतात
पूजेने ते होते पवित्र आणि निर्मळ

इकडे हे फुल क्वचित मध्यरात्री उमलते
हे उमलताना बघणे म्हणती शुभंकर
या शुभ्र फुलाची पूजा होते मनोभावे
मनामनात सुंदर रूप गंधाने राही निरंतर

सौ.माधुरी म.इनामदार. मिरज





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

# मैत्रीपर्व : गुरुदेव आणि लोकमान्य टिळक

गुरुदेव आणि लोकमान्य टिळक या दोघांनाही एकमेकांबद्दल प्रचंड आदर होता. जेव्हा पहिले महायुद्ध अंतिम टप्प्यात आले होते तेव्हा ते जिंकण्यासाठी ब्रिटिशांना भारताची मदत हवी होती. भारतातील नेत्यांना आवाहन करण्यासाठी त्यांनी दिल्लीमध्ये एका युद्ध परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेचे निमंत्रण मात्र लोकमान्य टिळकांना नव्हते. परंतु त्यांच्या विश्वासातील दादासाहेब खापर्डे यांना या परिषदेचे निमंत्रण होते. लोकमान्यांनी त्यांना गुरुदेवांची भेट घेण्याचा सल्ला दिला. तसेच बंगालमधील व्योमकेश चक्रवर्ती, कामिनीकुमार चंदा या मंडळींना देखील या परिषदेचे निमंत्रण होते. ही सगळी मंडळी या युद्धपरिषदेला जाण्यापूर्वी गुरुदेवांना भेटली आणि त्यांचा सल्ला घेतला. गुरुदेवांनी त्यांना या परिषदेत कोणती भूमिका घ्यावी याबद्दल सुयोग्य असे मार्गदर्शन केले. रवींद्रनाथ हे एक महान साहित्यिक असले तरी देशाच्या हिताच्या दृष्टीने विचार करणारे एक थोर पुरुष आहेत याची जाणीव या निमित्ताने सर्वांना झाली.

गुरुदेवांनी राष्ट्रीय चळवळीचा युरोपात प्रसार करावा आणि त्यासाठी ठिकठिकाणी व्याख्याने द्यावी या हेतूने लोकमान्यांनी त्यांना त्यासाठी लागणाऱ्या खर्चासाठी म्हणून पन्नास हजार रुपये पाठवले होते. परंतु गुरुदेवांनी ती रक्कम नम्रतापूर्वक परत केली आणि त्यांना असा निरोप पाठवला की राष्ट्रीय चळवळीच्या प्रचारार्थ मी युरोपात व्याख्याने देत फिरावे हे माझ्या मानसिक प्रकृतीला मानवण्यासारखे नाही. पुढे या दोघांची मुंबईला भेट झाल्यानंतर या विषयावर त्यांचे मनमोकळे बोलणे झाले. लोकमान्य गुरुदेवांना म्हणाले की तुम्ही राजकीय व्याख्याने देत फिरावे अशी माझी मुळीच इच्छा नाही. भारताचा जो सत्य संदेश जगाला तुम्हाला सांगावासा वाटतो तोच तुम्ही सांगा. तेच तुमचे खरे कार्य आहे. मला वाटते की मी पाठवलेली रक्कम तुम्ही स्वीकारावी. परंतु राजकीय कामासाठी लोकमान्यांना लोकांनी दिलेली रक्कम आपण स्वीकारावी असे गुरुदेवांना वाटले नाही. त्यांनी याबद्दल लिहिताना असे म्हटले आहे की टिळकांची ही निरपेक्ष उदारता गीतेचे रहस्य सांगणाऱ्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला शोभेशी अशीच होती. गीतेवर भाष्य लिहिण्याचा अधिकार अशा उदार व निरपेक्ष वृत्तीच्या महान व्यक्तिमत्त्वालाच असू शकतो.

राष्ट्रीय सभेचे अधिवेशन दिल्ली येथे भरणार होते. त्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून गुरुदेवांनी कार्य करावे अशी लोकमान्यांची इच्छा होती. परंतु गुरुदेवांनी सक्रिय राजकारणात भाग घेण्याचे नाकारले. असे असले तरी राष्ट्रीय चळवळीच्या निमित्ताने या महापुरुषांमधील राजकीय आणि सामाजिक विषयांवरील चर्चा सुरूच होत्या. १ऑगस्ट १९२० या दिवशी लोकमान्यांचे निधन झाले. त्यानंतर सुमारे दोन वर्षांनी गुरुदेवांचे पुण्यात आगमन झाले. त्यावेळी त्यांनी पुण्यात लोकमान्यांना आदरांजली वाहणारे एक व्याख्यान दिले. लोकमान्यांच्या स्मृती त्यांच्या हृदयात सदैव जागत्या होत्या.

## ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# इंडियन मेडिकल असोसिएशनचे उपक्रम
# गावागावात आरोग्यसेवा पोहोचवणारे-राजेश टोपे

## आय एम ए अध्यक्ष डॉ अनुपम टाकळकर यांच्या नेतृत्वात आओ गावं चले उपक्रमांतर्गत महाकाळा गाव दत्तक

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर –** ''आओ गांव चले'' या उपक्रमांतर्गत दिनांक १७ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हा जालना येथील महाकाळा गावात इंडियन मेडिकल असोसिएशन छत्रपती संभाजीनगर शाखेतर्फे भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे मुख्य अतिथी मा. श्री. राजेशजी टोपे (माजी आरोग्यमंत्री, महाराष्ट्र राज्य) तर अध्यक्ष स्थानी डॉ. अनुपम टाकळकर (अध्यक्ष, छत्रपती संभाजीनगर) होते. या शिबिरामध्येसकाळी भव्य उद्घाटन समारंभ संपन्न झाला. त्यानंतर विविध विभागांत रुग्ण तपासणी सुरू झाली. विशेष म्हणजे, प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र हॉलची व्यवस्था करण्यात आली होती, ज्यामुळे शिबिराची शिस्तबद्धता आणि नियोजन स्पष्टपणे जाणवले.



शिबिराची वैशिष्ट्ये : एकूण १०५१ रुग्णांची तपासणी विविध तज्ञ डॉक्टरांनी केली, नेत्र विभागात ऑटोरेफ्रॅक्टो मीटरद्वारे तपासणी करून गरजू रुग्णांना मोफत चष्म्यांचे वितरण करण्यात आले. शंभराहून अधिक रुग्णांमध्ये प्रथमच नंबर असल्याचे निदान झाले, शनिवारी टेस्टिंग साठी घेतलेल्या रक्त नमुन्यांच्या रिपोर्ट्सचे वितरण करण्यात आले. कमी हिमोग्लोबिन असलेल्या रुग्णांना एमडी मेडिसिन तज्ञांच्या सल्ल्याने *एक महिन्याचे आयर्न टॅब्लेट्स मोफत दिले गेले, ज्यांचे ब्लड शुगर जास्त आले, अशा रुग्णांना एन्डोक्रायनोलॉजिस्ट तज्ञांकडून मार्गदर्शन व योग्य औषधोपचार मिळाले, त्वचारोग विभागात सर्वाधिक १७६ रुग्ण तपासण्यात आले, यामध्ये बहुतांश स्टेरॉइड अॅब्यूजमुळे झालेले बुरशीजन्य संसर्ग व एक्झिमा यांचा समावेश होता, कॅन्सर, मेंदूचे विकार, हृदयविकार, स्त्रीरोग, बालरोग, अस्थिरोग, कान-नाक-घसा अशा जवळपास १५ हून अधिक विभागातील तज्ञ डॉक्टर या शिबिरात कार्यरत होते.

मान्यवरांचे मार्गदर्शन मा. राजेशजी टोपे यांनी IMA च्या ''IMA Connect'' आणि ''आओ गांव चले'' या उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक केले. त्यांनी सांगितले की, '' IMA ही केवळ डॉक्टर्सची संघटना नाही, तर समाजाच्या आरोग्याचे रक्षण करणारे सामर्थ्य आहे. असे भव्य व शिस्तबद्ध शिबिर हे डॉक्टरांच्या एकतेचे व सेवाभावाचे उत्तम उदाहरण आहे.''

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ''ही मोहीम केवळ आरोग्य तपासणीपुरती मर्यादित नसून, डॉक्टर समाजासाठी किती संवेदनशील व उत्तरदायी आहेत याचे प्रत्यक्ष दर्शन घडवणारी आहे. प्रत्येक डॉक्टरने या पवित्र ध्येयात सहभागी होणे हेच खरी राष्ट्रसेवा आहे.''

हे शिबिर हे अविस्मरणीय, नियोजनबद्ध आणि ऐतिहासिक शिबिर ठरले, IMA छत्रपती संभाजीनगर शाखेच्या सुयोग्य नियोजन, अथक परिश्रम आणि एकजुटीमुळे हे शिबिर भव्य यशस्वी झाले. IMA चे हे प्रयत्न निश्चितच समाजाला बळ देणारे असून, आरोग्य सेवा ग्रामीण भागापर्यंत पोहोचविण्यातील एक पवित्र मिशन ठरले आहे.

शिबिरात योगदान देणारे मान्यवर डॉक्टर

मेडिसिन : डॉ. योगेश लक्कस, डॉ. गितेश दळवी, डॉ संजय पाटणे, डॉ. जुनैद., स्त्रीरोग : डॉ. निर्मला कदम, डॉ. निशा तौर., अस्थिरोग : डॉ. यशवंत गाडे, डॉ. राजेंद्र शेवाळे, डॉ. उमाकांत करमाळकर, डॉ. सोहेल सय्यद., त्वचारोग : डॉ. अनुपम टाकळकर, डॉ. असावरी टाकळकर, डॉ. गौरव साळवे, डॉ अजिंक्य राजे., बालरोग : डॉ. दत्ता कदम, डॉ. शहाजी तौर, डॉ. श्रीनिवास तौर., एन्डोक्रायनोलॉजी : डॉ. प्रतिभा पवळ-औटे., हृदयरोग : डॉ. तुकाराम औटे., मेंदूरोग : डॉ. सचिन गुट्टे., नेत्ररोग : डॉ. राघवेंद्र चाकूरकर., जनरल सर्जरी व पोटाचे विकार : डॉ. शिवाजी तौर, डॉ. संजय खंडागळे., कान-नाक-घसा : डॉ. संभाजी चिंतळे., दंतरोग : डॉ. रश्मी दळवी., कॅन्सर विभाग : डॉ. अमोल उबाळे., रेडिओलॉजी : डॉ. अंजली गाडे., रक्तवाहिन्यांचे आजार : डॉ. शिवाजी पोळे. अशा या सर्वात मोठ्या, उत्तमरीत्या पार पडलेल्या आणि शिस्तबद्ध शिबिरामुळे च्या कार्याचा गौरव आणखी उंचावला आहे.






## मन आणि मानसोपचार





### "नो मोबाईल फोन फोबिया"

आज मोबाईल हा प्रत्येकाच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. लोकांना मोबाईलचे इतके व्यसन (Mobile Addiction) लागले आहे की सकाळी उठल्याबरोबर फोन हवाच. एवढेच नाही तर जेवताना आणि झोपतानाही लोकं फोन सोडत नाहीत. काही लोकांना मोबाईल उशीखाली ठेवून झोपण्याची सवय असते. याव्यतिरिक्त, व्यक्ती सकाळी प्रथम फोन तपासणे, संभाषणादरम्यान त्यांचा फोन वापरणे आणि त्यांचे फोन अॅक्सेस करण्यायोग्य नसताना अस्वस्थ किंवा चिंताग्रस्त होणे यासारखी लक्षणे. स्मार्टफोनचे व्यसन ही एक विकृती आहे ज्यामध्ये मोबाईल उपकरणांचा सक्तीचा अतिवापर होतो. ही चिंता इतकी व्यापक आहे की तिला नाव देण्यात आले आहे: नोमोफोबिया : ज्याचा अर्थ 'नो मोबाईल फोन फोबिया' आहे. कोरोनाकाळ खरंतर आपल्या प्रकारच्या स्क्रीन्सच्या फार जवळ घेऊन गेला सर्वांनाच तंत्रज्ञानाच्या आणि खास करून सर्व आहे. लॉकडाऊन काळात तर आपली मुलंही घरबसल्या ऑनलाइन शिक्षण घेऊ लागली. आपल्या सर्वांचाच स्क्रीन टाइम चांगल्याच प्रमाणात वाढला आहे. स्क्रीन टाइम म्हणजेच काय तर जो वेळ एखादी व्यक्ती कोणत्याही स्क्रीनसमोर घालवते तो वेळ. मग ते टीव्ही असो, लॅपटॉप- कॉम्प्युटर असो की मोबाइल, टॅबलेट की व्हिडिओ गेम.

■ स्क्रीनच्या अतिवापराची/व्यसन लागण्याची शक्यता असलेली लक्षणं

1. स्क्रीन काढून घेतल्यावर मुलांची चिडचिड होते. बेचैन दिसतात. 2. मन एकाग्र करण्याची क्षमता कमी होणे. 3. शिक्षणावर होणारे परिणाम. कमी गुण मिळणे, नापास होणे. 4. घरच्या कुठल्याही कामात, समारंभात सहभागी होण्यास टाळाटाळ करणे 5. एकटे राहायला आवडणे, 6. स्वत:च्या तब्येतीकडे दुर्लक्ष करणे, अर्धवट झोप होणे, सकाळी उशिरा उठणे. 7. व्यायामाची टाळाटाळ करणे. 8. घरच्यांशी, मित्रांशी संवाद कमी होणे. 9. एखाद्या व्यसनाधीन व्यक्तीच्या मेंदूत होणारे सर्व बदल स्क्रीनचे व्यसन असलेल्या व्यक्तीमध्ये दिसून येतात. मोबाइल फोनचा गैरवापर अनेकदा डोळ्यांवर ताण, डोकेदुखी, मानदुखी आणि दूरदृष्टी यांसारख्या शारीरिक आजारांमध्ये प्रकट होतो. शिवाय, जे स्मार्टफोनवर अवलंबून असतात त्यांना झोपेचा त्रास होतो कारण स्क्रीनद्वारे उत्सर्जित होणारा निळा प्रकाश झोपेच्या चक्रात अडथळा आणू शकतो. शेवटी, ज्यांना स्मार्टफोनची ओढ लागली आहे ते समोरासमोर बोलणे टाळतात आणि वास्तविक मित्रांसोबत वेळ घालवण्याऐवजी ऑनलाइन गेम खेळणे पसंत करतात.

उर्वरित उद्याच्या भागात........

उत्कर्ष हॉस्पिटल
छत्रपती संभाजीनगर - +91 88889 92688



डॉ. अमोल म. पाथ्रीकर
मानसोपचार व व्यसनमुक्ती तज्ञ



## इंदापूरी निखारे

### संवाद हरवत चाललाय....



ज्योतिर्मय साहित्य


सगळं कसं मस्त!
सुर्य चंद्र वेळेवर उगवतात
आणि मावळतात पण...
कधी मंद वारा
कधी सोसाट्याच्या वाऱ्यासह...
कधी भिरभिरणारा
कधी पिरपिरणारा पाऊस...
कधी कधी प्रचंड आवेगाने
आम्हा तुम्हाला कवेत घेणारा...
गुलाबी थंडी
उन्हाळा
आणि त्यांचे भावणारे अनेक रंग...
या सर्व आनंदात
मनात,स्वप्नात दिसतात
ते अंथरलेले गालिचे
हिरवे हिरवे गालिचे...
अगदी ठामपणे
कोणीही सांगु शकतो
सगळं कसं...
एकदम मस्त!
कधीकधी एखादी घटना घडते...
मग मन भुतकाळात जाते...
न कळत एखादी घटना आठवते...
अशीच एक घटना आणि तो जातो...
त्या ६०/६५ वर्षांपूर्वी घडलेल्या आठवणीत...
किती वय असेल?
स्वतःलाच प्रश्न विचारतो!
अरे असेल १०/१२ वर्षाचा...
वाड्यातील सर्व मुले मुली...
शाळेतून घरी आली...
पण नयना आली नव्हती...
तिच्या आईने विचारले...
अरे पोरांनो...
नयना आली नाही अजून?
होती की बरोबरच...
येईल ओ काकू...
एखादा तास झाला असेल...
वाड्याच्या पटांगणात...
वाड्यातील मुलेमुली जेवण करून...
काही खेळत होती...
काही झाडाखाली अभ्यास करत होती...
नयनाच्या आईने परत विचारले...
आली का नयना?
अजून नाही आली रे!
कुठल्यातरी मैत्रिणीकडे गेली असेल...
पाहता पाहता ३ तास होऊन जातात...
अजून आली नाही?
सगळ्यांना आता मात्र काळजी धावपळ करायला लावते...
काळजीचे अनेक चेहरे...
आजूबाजूच्या वाड्यात...
ओळखीच्या घरी...
नातेवाईकांच्या घरी...
शाळेत येण्याजाणाऱ्या रस्त्यावर...
काळजी सगळीकडे जाऊन आली...
पण नयना सापडली नाही...
काळजी रडवेले चेहऱ्यानी वाड्यातील प्रत्येक घरात वावरत होती...
६/७ तास झाले...
पण नयना मात्र...
आणि अचानक एक जोरात आवाज...
आनंदाने ओसंडून जाणाऱ्या चेहऱ्यावर...
नयना ताई आली...
एका पोलीस हवालदाराबरोबर...
सायकलवर डबल सीट घेऊन आला होता...
नयनाला तिच्या आईने घट्ट मिठीत घेतले...
अनेक प्रश्नांकित चेहरे...
न बोलता विचारत होते?
काय झाले?
पोलीस मामा म्हणाला...
आहो ताई, घाबरून गेली आहे पोरगी...
पहिल्या ५ नंबर मध्ये येते ना!
पण यावेळी ५ नंबर मध्ये आली नाही...
म्हणून घाबरून घरी न येता...
रेल्वे स्टेशन वरून चालत चालली होती...
मी ४ किलोमीटर वर असलेल्या पुलावर ड्युटीला...
ही एकटीच दिसली...
मग तिला विचारले...
तिला घेऊन आलो...
पण तिला तुम्हीच सांगा बरं!
अहो,कमी मार्क मिळाले म्हणून...
घरी यायला घाबरून जाते...
तिची चूक असेलही...
पण त्यापेक्षा जास्त चूक तुमची आहे...
काही बरं वाईट घडले नाही...
पण घडू शकते ना!
६०/६५ वर्षांपूर्वी घडलेली घटना...
आज आठवली...
तो वाडा...
ते मित्र मैत्रीण...
तो पोलीस मामा...
नयना आणि नयनाची आई...
किती रम्य आठवणींचे भावतरंग...
अशीच एक १२/१३ वर्षाची मुलगी...
एका विषयात नापास झाली म्हणून...
पळून गेलेली...
एकाने हेरले...
काळजी निर्लज्ज पणे हसली...
वासना मस्त मेजवानी मिळाली...
या आनंदात लाळ ओसंडून वाहू लागली...
आजकाल मुलीचे वय वगैरे पाहण्याची गरजच उरली नाही...
मुलगी आहे ना बस!
माणसं मरून गेलेली आहेत...
बाकी सूर्य चंद्र...
अगदी वेळेवर...
ते काही बदलले नाही...
बदलणार पण नाहीत...
पण माणसं मात्र प्रचंड वेगाने बदलत आहेत...
माणूस म्हणून जगण्यापेक्षा...
यंत्र म्हणून जगायला आवडत आहे...

# ''नॉट वन लेस''

ज्योतिर्मय साहित्य

सँगसेन शी यांच्या अ सन इन द स्काय या कथेवर यु चाओ यांनी निर्मिलेल्या आणि कार्यकारी निर्माता म्हणून वेईपिंग चांग यांनी दिग्दर्शित केलेल्या नॉट वन लेस (एकही कमी नाही) हा मराठी टायटल असलेला चित्रपट अनुभव फिल्म क्लबमुळे मला बघायला मिळाला. या चित्रपटाने जगभर प्रसिद्धी मिळविली. १९९९ साली चीनमध्ये असलेली शिक्षणाची विदारक स्थिती आणि चित्रपटाच्या शेवटी निर्माण झालेला आशेचा किरण भारतामधीलही दुर्गम भागातील शिक्षण व्यवस्थेवर प्रकाश टाकतो. हा चित्रपट केवळ ग्रामीण चीनमधील शिक्षणाची आणि दारिद्र्याची समस्याच मांडत नाही तर समाजमन, माध्यमांची शक्ती आणि सामान्य माणसांचे जिद्दीचे उदाहरण यातून आजूबाजूच्या समाजाला अंतर्मुख करतो.

काओ या शिक्षकाची आई आजारी असल्याने त्याला आईच्या सेवेसाठी घरी जायचे असते. परंतु १ ली ते ४ थी या चारही वर्गातील ४० विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी तो एकमेव शिक्षक असतो. यामधील १२ मुले घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने शाळा सोडून शहरात उद्योगधंद्यासाठी गेलेली असतात. त्या गावचा सरपंच १३ वर्षाची एक मुलगी 'वुई मिंझी' ही शिक्षिका म्हणून शाळेत घेऊन येतो. एक महिन्याचा पगार म्हणून तो तीला ५० युआन देण्याचे कबूल करतो. काओ या मुलीची परीक्षा घेतो आणि सरपंचाला म्हणतो, ही शिक्षिका म्हणून योग्य नाही. यावर सरपंच म्हणतात या दुर्गम भागात कसेतरी करून या मुलीला विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी घेऊन आलोय. तुला रजा नको असेल तर तीला परत जाऊ दे. काओ आपल्या प्रेमळ वागण्याने या मुलीला तीला येणारी गाणी तसेच रोज धड्यातील एक उतारा व इतर खेळ मुलांकडून करून घे असे सांगत परिस्थितीची जाणीव देत मोजून महिन्यातील रविवार सोडून राहिलेल्या २६ दिवसांसाठी २६ खडू देऊन गावाकडे जातो. जाताना यातील एकही विद्यार्थी शाळा सोडून जाता कामा नये. तसेच मी आल्यावर तुला मुलांना छान सांभाळल्यास जादा १० युआन देईन असेही सांगतो. काही विद्यार्थी शाळेतच रहात असतात




तसेच वुई मिंझी या मुलीची (शिक्षिकेची) सोयही आपली शाळेतली खोली तीला देऊन तिथेच केली जाते. शाळा रोज सोडण्यासाठी शाळेतील एक खिळा तिला दाखवितो. त्यावर सूर्यकिरण पडली कि, शाळा सोडायची. शाळेला ५० वर्षे पूर्ण झालेली असतात. शाळा सुटल्यानंतर शाळेत राहणाऱ्या मुलांबरोबरच ती रहात असते. यामध्ये वेई चुंक्षी ही मुलगी पण असते. ही मुलगी रोज रात्री जेवणानंतर ५ कि.मी. धाऊन येत असते. तीच्या आईने तीला सांगितले असते तूला घाम आला कि, रात्री तू अंथरुणात लघवी करणार नाहीस. त्याचबरोबर झांग हुई के हा दंगा करणारा मुलगाही शाळेतच रहात असतो. शिक्षिका बनलेली वुई मिन्झी ही १३ वर्षाची मुलगी सर्व २८ मुलांना एकत्र करून पहिल्या दिवशी शिकवीत असतानाच थकते. तीला शिकविण्यात रस नसतो. तीला ५० युआन आवश्यक असतात. स्वत:च मोडकी कविता तयार करून




शिकविते. फळ्यावर उतारा लिहून तो लिहिण्यास सांगून बाहेर येऊन बसते. मुले वर्गात दंगा करतात. झांग हुईके वर्ग प्रतिनिधी चांग मिंगशिएनशी दंगा करीत मस्ता करित असताना सर्व २६ खडूंची नासाडी होते. याच वेळेस सरपंच पाहुण्या व्यक्तीस शाळेत घेऊन येतो आणि वेई चुंक्षी या मुलीस वेळ लाऊन पळायला सांगतो. तीचे पळणे बघून आलेले पाहुणे तीला दुसऱ्या दिवशी शहरात घेऊन जाणार असे जाहीर करतात. शिक्षिका वुई मिन्झी मात्र टिचर काओने सांगितले नाही या कारणाने त्या मुलीस सोडण्यास नकार देते व तीला दुसऱ्या दिवशी वेगळ्या ठिकाणी अभ्यासास बसविते. दुसऱ्या दिवशी पाहुणे आणि सरपंच यांना तीचा थांगपत्ता लागू देत नाही. अशा वेळेस सरपंच झांग कुईके या दंगा करणाऱ्या मुलास ५० सेंट देऊन वेई चुंक्षी या मुलीचा पत्ता मिळवून वुई मिन्झी या शिक्षिकेला न जुमानता गाडीतून घेऊन जातात. शिक्षिका गाडीचा पाठलाग करते पण ती त्यांना रोखू शकत नाही. टीचर काओला आल्यावर काय सांगायचे हा तीला प्रश्न पडतो.

वर्गात झांग हुईके हा वर्गप्रतिनिधी चांग मिंगशिएनची डायरी पळवून ती डायरी वुई मिन्झी या शिक्षिकेसह सर्वांना वाचून दाखवतो. त्यात चांग मिंगशिएनने म्हंटले असते... मला खूप वाईट वाटतेय. दोन दिवसापूर्वी झांग ने वर्गात गोंधळ घातला. टेबल उलटवले. खडूची पेटी जमिनीवर पाडली. वुई मिन्झी या नवीन शिक्षिकेने त्याला ते उचलायला सांगितले पण त्याने ते उचलले नाही. वुई मिन्झी ने त्याला दूर केले. तिच्याकडे झांगने दुर्लक्ष केले. दोघांनी एकमेकांना ढकलले. खडू तुडवले गेले. वुई मिन्झी खडूंची काओ या माझ्या शिक्षकासारखी काळजी घेत नाही. शाळेकडे पैसे नाहीत. टेबलाच्या मोडलेला पाय दुरुस्त करण्यासाठी सरपंचांनी दिलेल्या पैशातून काओ याने खडू आणले होते. काओ खडूंची काळजी घेत आणि मी त्यांना मदत करीत असे. काओला खडूची ही नासाडी कळली तर त्याला वाईट वाटेल. हे जेंव्हा वुई मिन्झी ऐकते तेंव्हा तीच्यात बदलण्यास सुरवात होते. शिक्षिकेचा रोल तीचा मनापासून चालू होतो. वर्ग प्रतिनिधीला ती हजेरीपत्रक तयार करायला लावून रोज मुलांची हजेरी घेते. झांग ला नासाडी केलेल्या खडूंचे पैसे तसेच चांग मिंगशिएनला देऊन त्याची माफी मागायला लावते.

**(क्रमशः)**

---

# रविवारी छत्रपती संभाजीनगरात भव्य राज्यस्तरीय ब्राह्मण वधू वर मेळावा

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – अखिल भारतीय ब्राह्मण महासंघातर्फे छत्रपती संभाजीनगर येथे येत्या २४ ऑगस्ट २०२५ (रविवार) रोजी आयोजित विनामूल्य राज्यस्तरीय ब्राह्मण वधू वर मेळाव्याला ठिकठिकाणच्या ब्राह्मण वधू वरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे अशी माहिती अ.भा. ब्राह्मण महासंघाच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा शाखेचे अध्यक्ष सुधीर नाईक यांनी दिली.

यंदाचा मेळावा हा रौप्य महोत्सवी असून, यावेळी एक आठवडा आधीच १०० मुले आणि १०० मुलींनी नावनोंदणी केली आहे. ही संख्या ऐन वेळेपर्यंत विक्रमी ठरेल, असा विश्वास संयोजन समितीने व्यक्त केला आहे.

रविवार, दि.२४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत श्री समर्थ राम मंदीर, समर्थ नगर, छत्रपती संभाजीनगर येथे हा मेळावा होईल.

या मेळाव्याला छत्रपती संभाजीनगरसह जालना, परभणी, नांदेड, लातूर, धाराशिव, बीड, हिंगोली, सोलापूर, अयोध्यानगर, नाशिक, धुळे, जळगाव, पुणे, मुंबई, ठाणे या महाराष्ट्रातील जिल्ह्यांसह आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, गोवा येथील वधू वरांनीही नावनोंदणी केली आहे.

प्रथम वर, प्रथम वधू तसेच घटस्फोटीत मुले मुली, विधवा, विधूर स्थळांचीही नावनोंदणी झाली आहे.

हा मेळावा मोफत आहे. मात्र पुस्तकात नोंदणी व फोटो टाकणे तसेच पोस्टाने पुस्तक पाठवणे यासाठी नाममात्र शुल्क आकारले जाईल. आलेल्या वधू वर व पालकांची भोजन व चहापानाची व्यवस्था करण्यात आली आहे.

इच्छुक वधू वरांनी खालील पैकी कुठल्याही मोबाईल नंबरवर आपली नावनोंदणी करता येईल – जिल्हाध्यक्ष सुधीर नाईक ९९२२५२६६८७, मंदार रेडे जिल्हाध्यक्ष पुणे ९८२२५२००३४, शशांक खेर ठाणे ८०९७३५८१२०, सह महिला जिल्हाध्यक्ष सुचेता पालोदकर ७४९८१८९९२६, अंजली गोरे ९३२५२६०८६८, दिलीप लाड ९४०४२९४३९२, सौ छाया खोचे ९३२५०७९५६५, स्मिता जोशी ७३५०६६१४२७, अंजली पराडकर ८८८८३३१७५३, सीमा नांदापूरकर ९९२१४६९६५९, अंजली देशपांडे ९१५८००११९९, कु. गायत्री न्यायाधीश ७०६६५७७८९७, डॉ मयुरी कुलकर्णी ८३९०१२७९५१, ॲड. अश्विनी कुलकर्णी ८८३०७९०८८०, दीपक कुलकर्णी ९९६०६८२५६९, मोहन काळे ९४२३७०७००१, स्मिता नगरकर ९८८११७८३९१, नंदकुमार अदवंत ८०८७७६९१४, शशिकांत पाठक लातूर ७६६६०८६६८४, सुरेखा पारवेकर ८०८७८६६२८०, सुभाष जोशी ८३२९३२२०७०, कालिदास त्रिवेदी ८६६८३२६६८४, सुभाष डबीर ९८५०१११५०१.

---

# ज्येष्ठ नागरिक महिला कलावंतांचा बहारदार कलाविष्कार

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे (विजय न्यायाधीश)**– श्रवणीय सदाबहार गाणी, पारंपरिक लोकगीते, कविता आणि बहारदार नृत्याविष्काराने नटलेला ''श्रावणाचे रंग'' कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला. विशेष म्हणजे साठ ते ऐंशी या वयोगटातील ज्येष्ठ नागरिक महिलांनी हा कार्यक्रम सादर करुन तरुणाईला लाजवेल असा उत्साह दर्शवित हम भी कुछ नहीं हे दाखवून दिले. पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या वतीने रविवारी सायंकाळी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कुणाल आयकॉन रोडवरील बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणावर झालेल्या या कार्यक्रमास उन्नती सोशल फाउंडेशनच्या संचालिका डॉ. कुंदाताई भिसे, पिंपरी चिंचवड मनपाच्या मा. नगरसेविका निर्मला कुटे तसेच वसुंधरा भिसे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.



गणेश स्तवनाने प्रारंभ झालेल्या या रंगारंग कार्यक्रमात विविध प्रकारच्या गाण्यांसह लोकनृत्य, भारुड, गोंधळ, कविता सादर करुन महिलांनी उपस्थितांची भरभरून दाद मिळवली. कानबाई देवीचा महिमा वर्णन करणाऱ्या गीता वरील नृत्य, रिमझिम झरती श्रावणधारा, रिमझिम गिरे सावन, सांज ये गोकुळी ही काही गाणी तसेच भारुड, लोकनृत्याला रसिकांनी विशेष पसंती दर्शविली. दोन ते अडीच तास चाललेल्या या कार्यक्रमात पद्मा गवळी, करुणा नवले, साधना चौधरी, शैलजा लोकरस, माधुरी मुलमुले, भामिनी महाले, शोभा पोरवाल, मसाळकरताई, मीना राव, मंगल पाटील, भारती लिगाडे, उषा भागवत, सुरेखा पाटील, भारती पाटील, अलका पवार, वीणा वाणी, पुष्पा इंगळे, अनघा वडनेरकर आदींनी सहभाग नोंदविला. किती सांगु मी सांगु कुणाला या गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शोभा राजगुरे यांनी केले. सुत्रसंचलनाची जबाबदारी शकुंतला शिंदे, निर्मला कासार यांनी सांभाळली तर भामिनी महाले यांनी आभार मानले.

ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुभाषचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सखाराम ढाकणे, सुभाष पाटील, रमेश चांडगे, विवेकानंद लिगाडे, दिलीप चौगुले, अनिल कुलकर्णी, अशोक येळंमकर, अशोक कलाल, रमेश वाणी आदी पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

---

# माऊलींच्या कृपेने...!

ज्योतिर्मय साहित्य

काही माणसं आपल्याला अचानक कुठेतरी भेटतात अगदी थोड्या वेळा साठी... पण आपल्या स्मरणात राहतात, आपल्याला भारावून टाकतात. यापैकीच एका आजोबांची गोष्ट... एकदा आम्ही काही दिवस निवांत निसर्गाच्या सानिध्यात राहण्यासाठी एका रिसॉर्ट वर गेलो. डोंगर पठारावर असलेले हे ''स्वप्ननगरी'', अगदी नावाप्रमाणेच सुंदर रिसॉर्ट. वरुन पुर्ण सातारा शहर दिसत होते. संध्याकाळच्या वेळी गाव आणि आजूबाजूचे डोंगर सोनेरी सूर्यप्रकाशात न्हाऊन निघाले होते. आकाशात सूर्य मावळत आला होता. वेगवेगळया रंगांनी आकाशात गर्दी केली होती. खूप नयनरम्य दृश्य होते.

आम्ही रिसॉर्ट मधेच बागेत बसलो होतो. तिथे बाजूलाच एक आजोबा एका खुर्चीवर बसले होते. समोर एक खुर्ची ठेऊन त्यावर एक पाय सरळ ठेवला होता. बाजूलाच आधारासाठी एक काठी होती. पेहेराव एकदम साधा.पांढऱ्या रंगाचा सदरा आणि पायजमा.

आमचा छोटा डॉग बॉल सोबत खेळत होता. त्याला पाहून ते खुश होते. मी सहज विचारलं कुठे राहता तुम्ही . तर ते म्हणाले मी मालक आहे मॅडम रिसॉर्टचा. आता माझी मुलं बघतात सगळं. त्यांनी त्यांची जीवन कहाणी सांगायला सुरू केली. आणि मी ती भान विसरून ऐकत राहिले.

माझं वय ८३ वर्ष आहे. एके काळी मी मुंबईत हातगाडी ओढत होतो. पण आता माऊलींच्या कृपेने सगळं चांगलं हाय. माझी तिन्ही मुलं आता सेटल झाली हाएत. नातवंड हाएत. दोन मुलांचे आता बिझनेस हाएत. मुंबई मधी एकाची कंपनी हाय. एक जॉब करतो तो ही चांगल्या कंपनीत मोठ्या पदावर हाय. मी लई समाधानी हाय बघा. खूप आनंदी हाय. अजून काय पाहिजे हो. इथं दिवसभर बसतो आलेल्या लोकांशी बोलतो. बिझनेस करायचा म्हटलं की जीभ गोड पाहिजे बघा.

मला पॅरॅलिसिसचा ॲटॅक आला होता. पूर्ण उजवा हात आणि पाय हालत नव्हता. पण मुलांनी धावपळ करून, चांगल्या दवाखान्यात माझा उपचार केला. माऊलींच्या कृपेने आता ठीक हाय. चालताना फक्त काठीचा आधार घ्यावा लागतो.




आयुष्यात कधी कोणाचे काही आक्रित घेतलं नाय, लबाडी केली नाय. आता माझी बायको या जगात नाहिये. बायकोनं मला लई साथ दिली. ती पण असल तसं राहिली, लई कष्ट केले, कधी कशाची हाव केली नाय. गावात राहुन शेतीत काबाडकष्ट करून धान्य पिकवायची. नंतर मुंबईत असताना पैसे साठवून तिला लक्ष्मी हार केला होता. मी तिला घेतलेला पहिला दागिना. हे सांगताना आजोबांच्या डोळ्यात वेगळाच आनंद दिसत होता. पॅरॅलिसिसचा ॲटॅक आला होता तवा तीनं माझी लई सेवा केली. अगदी आई बनून सेवा केली. माझ्यासाठी ती देवीच हाय बघा. अगदी गुंग होऊन ते जुन्या आठवणी, त्या काळचे दिवस सांगत होते. आमच्या समोरच एक व्हीला होता. त्याकडे हात करून म्हणाले हा व्हीला मुलांनी मला राहण्यासाठी बांधलाय. मुलांनी त्यांच्या आईचं नाव दिलंय बघा घराला लक्ष्मी निवास. अजून काय पाहिजे ओ.. माऊलींच्या कृपेने सगळं छान हाय. पण मी




तिथं राहत नाही. मला तिथं झोप नाही लागत.

शेजारीच एक छोटी रूम होती त्याकडे बोट दाखवून म्हणाले, मी इथे राहतो दिवसभर बाहेरच बसतो. आलेल्या लोकांशी बोलतो. विचारपूस करतो. रूम मध्ये मी आमच्या लग्नातली खाट आठवण म्हणुन अजून ठेवलीय, तिची साडी ठेवलीय. तिची चप्पल अजून जपून ठेवलीय. रोज मी त्या चपलीच्या पाया पडतो. आणि हे ऐकून माझ्या अंगावर शहारे आले. त्यांच्या मनातील बायकोचे स्थान किती उच्च पातळीवर होते. आणि ते त्यांच्या भरून आलेल्या आवाजात स्पष्ट जाणवत होते. आतापर्यंत बायकोवर खूप प्रेम करणारे, ती गेल्यानंतर तिचा फोटो ठेवणारे, तिची आठवण काढणारे बरेच जण पाहिले होते पण बायकोची चप्पल ठेऊन त्याच्या रोज पाया पडणारा हा माणूस विरळाच.

त्यांनी पुढे सांगायला सुरुवात केली तिने आयुष्यात सगळ्यांसाठी खूप कष्ट केले. आज तिच्या नावाने मुंबईत एनजीओ आहेत, मूलं तिच्या नावाने अन्नदान करतात. अजून काय पाहिजे ओ, मी लई समाधानी हाय. माऊलींच्या कृपेने सगळं चांगलं हाय. तुम्ही जायच्या आधी माझी रूम एकदा बघून जावा. मी हो म्हणाले. तोपर्यंत आमचे जेवण तयार आहे असा निरोप आला. ते म्हणाले गरमागरम जेऊन घ्या. जेवण कसं हाय ते सांगा. मनात विचार करतच मी जेवणासाठी निघाले. खरंच माऊलींच्या कृपेनेच हे आजोबा आजच्या युगातही एव्हढे समाधानी, आनंदी आहेत. त्यांच्या मनात देवाची सतत आठवण,भक्ती, सतत देवाला हात जोडून माऊलींच्या कृपेने सगळं चांगलं हाय असं म्हणणं. बायकोबद्दल एव्हढी कृतज्ञता . सगळंच अचंबित करणारं होतं.

रिसॉर्ट मधून निघताना आधी मी आजोबांना भेटायला गेले. त्यांची रूम पाहिली. एकदम नीटनेटकी, त्यांच्या आठवणींनी ओतप्रोत भरलेली, देव्हारा, त्यापुढे तेवणारा दिवा, त्यांची लग्नातली खाट, भिंतीवर लावलेला बायकोचा फोटो– नथ घातलेली, कपाळावर मोठे कुंकू, पैठणी, डोक्यावर पदर गळ्यात आजोबांनी घेतलेला लक्ष्मी हार आणि इतर दागिने. बाजूलाच आठवण म्हणुन ठेवलेली बायकोची चप्पल. मी रूम च्या बाहेर येऊन त्यांना म्हणाले खूप मस्त ठेवलीय रूम. खूप छान वाटलं तुम्हाला भेटून, खूप काही शिकायला मिळालं, असं म्हणून मी त्यांच्या पाया पडून आशिर्वाद घेतला.

आजोबांबरोबरच्या संवादातून बरेच काही शिकायला मिळाले. सगळे ऐकून माझेही मन समाधानाने काठोकाठ भरले आणि तिथला आमचा मुक्काम अविस्मरणीय ठरला.

---



# सनातन साधनेव्दारे अध्यात्मिक प्रसार आवश्यक – अनिल जठार

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे** – वैज्ञानिक प्रगतीच्या नावाखाली आपल्या धर्मावर आघात होत आहेत, मोठ्या प्रमाणात गैरसमज निर्माण केले जात असून या पार्श्वभूमीवर सनातन साधनेव्दारे अध्यात्मिक प्रसार होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन सनातन साधक अनिल जठार यांनी केले. पिंपळे सौदागर येथील श्री संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्थेच्यावतीने आयोजित ज्ञानेश्वर जयंती निमित्त कार्यक्रमात ते बोलत होते. स्व. बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणावर शनिवारी सायंकाळी झालेल्या या कार्यक्रमाचा प्रारंभ ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन आणि दिपप्रज्वलनाने झाला. विलास जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून अनिल जठार आणि सुभाष काळे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. सुभाष काळे यांनी ज्ञानेश्वर माऊलींबाबत मनोगत व्यक्त केले. सुरुवातीला प्रकाश मोदी, शशिकांत कुलकर्णी, माधुरी मुलमुले, प्रमिला देशपांडे यांनी भक्तीगीते सादर केली. विजया तारे, शैलजा लोकरस, भावना बुजोणे, राजेंद्र देशमुख यांनी ज्ञानेश्वर माऊली आणि श्रीकृष्ण यांच्याविषयी विचार मांडले. श्रीनिवास पारखी आणि विलास जोशी यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. सुत्रसंचलनाची जबाबदारी रमेश भट यांनी सांभाळली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी राजेंद्र कुलकर्णी, अनिल कुलकर्णी, श्रीनिवास जोशी आदींनी परिश्रम घेतले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे–४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559